**MHMM190014442021**

महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालयात
<u>६६ वे न्यायालय, अंधेरी, मुंबई</u>

<u>नोटीस क्र</u> :— <u>१५२/एन्/२०२१</u> गुन्हा नोंद क्र :— ७२/२०२१.
पोलीस ठाणे साकीनाका

जुबेर मारूफ अहमद खान ... अर्जदार.

विरूध्द्

महाराष्ट्र सरकार, ... गैरअर्जदार.
द्वारा — वरिष्ठ पोलीस निरिक्षक,
(साकीनाका पोलीस ठाणे)

<u>निशाणी क्र.—१ खालील आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज साकीनाका पोलीस ठाणे गुन्हा क. ७२/२०२१ कलम ३७९ भा.द. वि. संहितामध्ये जप्त वाहन सीबी शाईन मोटर सायकल नोंदणी क्र.एम.एच. —०३—बीएक्स—३४०२ चा अंतरिम ताबा मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. अर्जदाराकडे आर.सी.बुक असून ते त्याच्या नावावर आहे. अशी कथने करून अर्ज मंजूर होण्याची विनंती अर्जदाराने केलेली आहे. अन्वेषन अधिकारी आणि शासकीय अभियोक्ता यांचे म्हणणे वाचले. अर्ज मंजूर होण्यास त्यांनी आक्षेप घेतला नाही. अर्जदाराच्या वकीलांचा आणि शासकीय अभियोक्ता यांचे युक्तिवाद ऐकले.

२. अर्जाच्या पृष्ठर्थ अर्जदाराने स्वतःचे शपथेवर प्रतिज्ञापत्र आणि जप्त वाहनाच्या आर. सी.बुक ची पडताळणी केलेली प्रत (निशाणी क.४) दाखल केलेली आहे. तपासी अंमलदार यांनी देखील मुदद्येमाल अर्जदारास परत करण्यासाठी हरकत घेतलेली नाही. तसेच जप्त वाहनाच्या आर.सी.बुक ची पडताळणी केलेली प्रत (निशाणी क.४) वरून अर्जदार जप्त वाहनाचा मालक दिसत आहे. आजपर्यंत इतर कोणीही जप्त मुदद्येमालाबाबत कोणत्याही प्रकारे दावा केलेला नाही. त्यामुळे अर्ज अटी व शर्तीवर मंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

<u>आदेश</u>

१ अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२ संबंधित तपासी अंमलदार यांना आदेशीत करण्यांत येते की, साकीनाका पोलीस ठाणे गुन्हा क्र. ७२/२०२१ कलम ३७९ भा.द.वि. संहितामध्ये जप्त वाहन सीबी शाईन मोटर सायकल नोंदणी क्र.एम.एच.—०३—बीएक्स—३४०२ चा अंतरिम ताबा अर्जदारास त्याने रू. ५०,०००/. (रू. पन्नास हजार फक्त) चा क्षतीपूर्ती बंधपत्र दिल्यावर खालील अटींवर त्यास देण्यात यावा.

३ अर्जदाराने जप्त मुदद्देमाल न्यायालयाच्या पूर्व परवानंगी शिवाय हस्तांतरित करू नये अथवा त्यामध्ये बदल करू नये.

४ तपासी अंमलदार यांनी जप्त मुदद्देमालांचे छायाचित्रे सर्व बाजूंनी भविष्यातील त्याच्या ओळखीसाठी काढावेत व त्याबाबतचा दोन पंचासमक्ष सविस्तर पंचनामा तयार करावा.

५ छायाचित्रे, पंचनामा व क्षतीपूर्ती बंधपत्र अन्वेषन अधिका—याने दोषारोपपत्रासोबत अथवा अंतिम अहवालासोबत दाखल करावेत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Bhagawat Tukaram Zirape
Date: 2021.02.18 18:01:17 +0530

दि.१८/०२/२०२१.

(भागवत तु. झिरपे)
महानगर दंडाधिकारी,
६६वे न्यायालय, अंधेरी, मुंबई.